# प्रकरण सहावे

# निष्कर्ष आणि शिफारशी

# प्रकरण सहावे

## निष्कर्ष आणि शिफरशी

### विभाग "अ"

### निष्कर्ष

6.01 प्रास्ताविक

6.02 मुख्याध्यापकांच्या वैयक्तिक माहिती विषयक निष्कर्ष

6.03 प्राथमिक शाळेच्या माहितीसंदर्भात निष्कर्ष

6.04 कार्यालयीन कामकाज व शालेय दप्तर विषयक निष्कर्ष

6.05 प्राथमिक शाळेच्या शिक्षकाविषयी निष्कर्ष

6.06 विद्यार्थ्याविषयी विषयी निष्कर्ष

6.07 भौतिकसुविधा व शालेय परिसर विषयक निष्कर्ष

6.08 केंद्रप्रमुखांच्या मुलाखतीचे निष्कर्ष

6.9 शिक्षणविस्तार अधिकाऱ्यांच्या मुलाखतीचे निष्कर्ष

6.10 गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या मुलाखतीचे निष्कर्ष

6.11 प्राथमिक शाळांना दिलेल्या भेटी व निरीक्षणातील माहितीचे निष्कर्ष .

### विभाग "ब"

### शिफारशी

6.12 मुख्याध्यापकांच्या वैयक्तिक माहितीविषयक शिफारशी

6.13 प्राथमिक शाळेच्या माहितीसंदर्भात शिफारशी

6.14 कार्यालयीन कामकाज व शालेय दप्तरविषयी शिफारशी

6.15 प्राथमिक शाळेच्या शिक्षकाविषयी शिफारशी

6.16 विद्यार्थ्याविषयी विषयी शिफारशी

6.17 भौतिकसुविधा व शालेय परिसरसंबंधी शिफारशी

6.18 केंद्रप्रमुखांच्या मुलाखतीचे माहितीविषयक शिफारशी

6.19शिक्षणविस्तार अधिकाऱ्यांच्या मुलाखतीतील माहितीविषयक शिफारशी

6.20 गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या माहितीविषयक शिफारशी

6.21 प्राथमिक शाळांना दिलेल्या भेटी व निरीक्षणाबाबत शिफारशी.

**विभाग "क"**

**पुढील संशोधनासाठी विषय**

6.22 माध्यमिक शाळेच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास

6.23 कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास

6.24 वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास

6.25 पूर्वमाध्यमिक शाळांसाठी स्वतंत्र प्रशासन निर्मिती संबंधी पाहणी करणे.

## विभाग " अ" निष्कर्ष

6.01 **प्रास्ताविक** :-

प्रकरण 1 ते 4 मध्ये प्राथमिक शाळांच्या प्रशासनाचा आढावा घेतला आहे. वरील प्रकरणे तात्विक स्वरुपाची आहेत. प्रकरण 5 मध्ये मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख शिक्षणविस्तार अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांच्या प्रतिसादातून आणि दहा प्राथमिक शाळांना दिलेल्या भेटी व केलेली निरीक्षणे यातून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण आणि विशदीकरण केले आहे.संशोधनाचे निष्कर्ष आणि शिफारशी या प्रकरणाच्या अधारे अभ्यासकाने दिल्या आहेत.

6.02 **मुख्याध्यापकांच्या वैयक्तिक माहिती विषयक निष्कर्ष**

1) उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शाळांच्या प्रतिसादक मुख्याध्यापकांत एस. एस. सी. डी. एड्. असणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 47.43 % होते. तर एस. एस. सी. ज्यु. पी. टी. सी. असणाऱ्या मुख्याध्यपकांचे प्रमाण 23.08% होते. आणि एच. एस. सी. डी. एड्. असणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 6.41 % होते.

2) प्राथमिक शाळेमध्ये एस. एस. सी. ज्यु. ट्रेंड्. व एस. एस. सी. सिनियर ट्रेंड असणाऱ्या मुख्याध्यपाकांचे प्रमाण 4.13% होते.

3) प्राथमिक शाळेमध्ये पी. एस. सी. ज्यु. ट्रेंड व सातवी ज्यु-ट्रेंड असणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 4.13 % होते.

4) प्राथमिक शाळेमध्ये प्राथमिक पदवीधर ( बी. ए. डी. एड्. ) असणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 3.85 % होते.

5) प्राथमिक शाळेमध्ये पदवीधर प्रशिक्षित असणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 4.13 % होते.

6) प्राथमिक शाळेमध्ये प्रतिसादक मुख्याध्यापकांत पदव्युत्तर प्रशिक्षित असणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 2.56 % होते.

7) प्राथमिक शाळेमध्ये अप्रशिक्षित मुख्याध्यापकांचे प्रमाण 1.28 % होते.

8) प्राथमिक शाळेमध्ये मुख्याध्यापकांच्या शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेत विविधता आढळून आली.

9) प्राथमिक शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक म्हणून काम पाहणाऱ्यांचे प्रमाण 42.308 % होते.

10) प्राथमिक शाळेचे कायम स्वरुपी मुख्याध्यापक म्हणून काम पाहणाऱ्यांचे प्रमाण 57.692 % आहे.

11) मुख्याध्यापकांच्या प्राथमिक शाळंच्या प्रशासनाचा सरासरी अनुभव 10 वर्षे दिसून आला.

12) तीन वर्षाचा प्रशासनाचा अनुभव असलेल्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 24.36 % होते.

13) आठ वर्षाचा प्रशासनाचा अनुभव असलेल्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 28.30 % होते.

14) दहा वर्षाचा प्रशासनाचा अनुभव असलेल्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 20.52 % होते.

6.03 **प्राथमिक शाळेच्या माहितीसंबंधी निष्कर्ष :-**

1) उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शाळा ग्रामीण भागात असण्याचे प्रमाण 74.36 % होते.

2) प्राथमिक शाळा शहरी भागात असण्याचे प्रमाण 25.64 % होते.

3) ग्रामीण भागात जास्त प्राथमिक शाळा असण्याचे आढळून आले.

4) उस्मानाबाद तालुक्यात मुला-मुलींची मिश्र प्राथमिक शाळा असण्याचे प्रमाण 94.87 % होते.

5) फक्त मुलींची प्राथमिक शाळा असण्याचे प्रमाण 3.85 % होते.

6) फक्त मुलांसाठी प्राथमिक शाळा असण्याचे प्रमाण 1.28 % होते.

7) फक्त मुलांसाठी स्वतंत्र प्राथमिक शाळा असल्यांचे प्रमाण सर्वात कमी होते.

8) उस्मानाबाद तालुक्यात कनिष्ठ प्राथमिक शाळांचे प्रमाण 51.28 % होते.

वरिष्ठ प्राथमिक शाळांचे प्रमाण 44.87 % होते. तर प्राथमिक व माध्यमिक शाळा एकत्र असल्याचे प्रमाण 3.85 % होते.

9) उस्मानाबाद तालुक्यातील कनिष्ठ प्राथमिक शाळांचे प्रमाण सर्वात जास्त होते.

10) उस्मानाबाद तालुक्यात जिल्हा परिषदमार्फत चालविल्या जाणाऱ्या शाळांचे प्रमाण 69.23 % होते.

11) नगरपालिकेमार्फत चालविल्या जाणाऱ्या प्राथमिक शाळांचे प्रमाण 17.95 % होते. तर खाजगी संस्थेमार्फत चालविल्या जाणाऱ्या प्राथमिक शाळांचे प्रमाण 12.82 % होते.

12) उस्मानाबाद तालुक्यात जिल्हापरिषदेमार्फत चालविल्या जाणाऱ्या प्राथमिक शाळांचे प्रमाण सर्वात जास्त व खाजगी संस्थेमार्फत चालविल्या जाणाऱ्या शाळांचे प्रमाण सर्वात कमी असल्याचे आढळून आले.

13) उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शाळांमध्ये शिकणाऱ्या मुलांचे प्रमाण 52.13 % होते. तर मुलींचे प्रमाण 47.87 % होते.

14) मुलांचे पहिलीत असणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण इयत्ता सातवीपर्यंत जाईपर्यंत % नी कमी होते, असे आढळून आले. याचाच अर्थ गळतीचे प्रमाण जास्त आहे.

15) उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शाळांमध्ये पुरुष शिक्षकांचे प्रमाण 65 % होते.

16) उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शाळांमध्ये स्त्री शिक्षकांचे प्रमाण 35 % होते.

17) स्त्री शिक्षकांचे प्रमाण पुरुष शिक्षकांच्या तुलनेत अत्यंत कमी होते.

18) उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शाळेमध्ये काम करणाऱ्या लिपीक कर्मचाऱ्यांचे प्रमाण 12.82 % होते. तर सेवक कर्मचाऱ्यांचे प्रमाण 16.66 % होते.

20) प्राथमिक शाळेमध्ये लिपीक व सेवक कर्नचाऱ्यांची संख्या अत्यंत कमी आहे, असे आढळून आले.

6.04 **कार्यालयीन कामकाज व शालेय दप्तर विषयक निष्कर्ष** :-

1) उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शाळेतील प्रत्येक वर्गाची हजेरी घेणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण 100.00 % आहे असे दिसून येते.

2) उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शाळेतील 100 % शिक्षक महिना अखेरीस मुख्याध्यापकांची स्वाक्षरी घेतात असे आढळून आले आहे.

3) प्राथमिक शाळेतील उशीरा येणाऱ्या शिक्षकांसाठी " लेट मस्टर " न ठेवणाऱ्या प्राथमिक शाळांचे प्रमाण 7.692 % असल्याचे दिसून आले.

4) प्राथमिक शाळेत येणारी पुस्तके, मासिक यांची स्वतंत्र नोंद 97.436 % शाळांमध्ये ठेवली जाते. 2.564 % प्राथमिक शाळांमध्ये पुस्तके, मासिक यांची स्वतंत्र नोंद ठेवली जात नाही असे निदर्शनास आले.

5) प्राथमिक शाळेत वर्षभरात ज्या किरकोळ दुरुस्त्या केल्या जातात. त्याची नोंद ठेवणाऱ्या शाळांचे प्रमाण 88.46 % आहे.

11.54 % प्राथमिक शाळा वर्षभरातील किरकोळ दुरुस्तीच्या नोंदी ठेवत नाहीत असे आढळून आले.

6) वेळापत्रक व वार्षिक नियोजन 100 % प्राथमिक शाळाविहित नमुन्यात ठेवतात असे दिसून आले.

7) प्राथमिक शाळेमध्ये, तपासणी अधिकाऱ्यांसाठी 100.00 % शाळा नोंदवही ठेवतात असे आढळून आले.

8) विद्यार्थ्यांना दाखला देत असताना त्यावरील नोंदी 100 % मुख्याध्यापक तपासून पाहतात असे दिसून आले.

9) ग्रामशिक्षण समातीच्या कार्यविषयक अहवालाच्या नोंदी 92.31 % मुख्याध्यापक ठेवतात. नोंदी न ठेवणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 7.69 5 आहे. असे दिसुन आले.

10) उस्मानाबाद तालुक्यातील, प्राथमिक शाळांचे 100.00 % मुख्याध्यापक खात्यांची परिपत्रके शिक्षक व कर्मचारी यांच्या निदर्शनास आणतात, असे आढळून आले.

11) प्राथमिक शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके अद्ययावत ठेवणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 100% होते.

12) प्राथमिक शाळांच्या रोजकिर्द व खतावणी वेळच्या वेळी लिहिणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 73.07 % होते तर रोजकिर्द व खतावणी वेळच्यावेळी न लिहिणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 26.93 % होते.

13) शासनाकडून प्राथमिक शाळांना मिळणारे अनुदान पुरेसे आहे, असे 85.38 % मुख्याध्यापकांचे मत असल्याचे आढळले.

14) शासनाकडून प्राथमिक शाळांना मिळणारे अनुदान अपुरे आहे, असे 34.62 % मुख्याध्यापकांचे मत आहे.

15) उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शाळांकडे पुढीलप्रमाणे फाईल रजिस्टर उपलब्धता होती.

| | |
|---|---|
| अ) प्रवेश अर्ज फाईल | 100.00 % |
| ब) शेरेबुक | 100.00 % |
| क) परिपत्रक नस्ती | 100.00 % |
| ड) हालचाल नोंदवही | 100.00 % |
| इ) आरोग्य तपासणी नोंदवही | 87.17 % |

16) प्रतिसादक मुख्याध्यापकांनी प्राथमिक शिक्षणविषयक राबविल्या जाणाऱ्या योजनांचे प्रमाण पुढीलप्रमाणे होते हे स्पष्ट केले.

अ) गणवेश वाटप 76.92 %

ब) पुस्तक पेढी 88.46 %

क) लेखन साहित्य 67.94 %

ड) उपस्थिती भत्ता 73.07 %

6.05 **प्राथमिक शाळांच्या शिक्षकाविषयी निष्कर्ष :–**

1) उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शाळांमध्ये सर्व विषयांस पुरेसे शिक्षक आहेत असे 80.76 % मुख्याध्यापकांचे मत असल्याचे आढळले.

2) प्राथमिक शाळामध्ये सर्व विषयास पुरेसे शिक्षक नाहीत असे 19.24 % मुख्याध्यापकांचे मत असल्यांचे अढळले.

3) 100 % प्राथमिक शाळा घटकनियोजन व वार्षिक नियोजन ठेवतात असे दिसून आले.

4) 100 % शिक्षक पाठटाचण काढतात असे दिसून आले.

5) 44.88 % मुख्याध्यापक महिन्यातून दोनवेळा शिक्षकांचे पाठनिरीक्षण करतात असे आढळून आले.

6) 17.94 % मुख्याध्यापक महिन्यातुन तीनवेळा पाठनिरीक्षण करीत होते.

7) 37.18 % मुख्याध्यापक महिन्यातून चारवेळा पाठनिरीक्षण करतात असे दिसून आले.

8) शिक्षकांचे पाठनिरीक्षण करणाऱ्या मुख्याध्यपकांचे प्रमाण 100 % होते.

9) प्रतिसादक मुख्याध्यापक शिक्षकांचे पाठनिरीक्षण करीत असताना खालील बाबी लक्षात घेतात.

अ) शिक्षकांची अध्यापन पध्दती, पूर्वज्ञान, विषयांची तयारी व त्यावरील प्रभुत्व पाहिले जाते.

ब) पाठटाचण, पाठनियोजन पाहिले जाते.

क) फलकलेखन, भाषाकौशल्य, प्रश्नकौशल्य, विद्यार्थ्यांचा पाठात सहभाग पाहिला जातो.

ड) अभ्यासक्रमाची उद्दिष्टे व माहिती पाहिली जाते.

इ) प्रसंगावधान, अभिनय, विद्यार्थ्यांची उपस्थिती, स्वाध्याय पाहिले जाते.

10) पाठनिरीक्षणानंतर शिक्षकांना तोंडी व लेखी सूचना देणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 33.33 % होते. मार्गदर्शन करणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 44.87 % होते. तर प्रशंसा करणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण 21.80 % होते.

11) पाठनिरीक्षणानंतर शिक्षकांना मार्गदर्शन करणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण सर्वात जास्त (44.87 % ) होते.

12) प्रतिसादक मुख्याध्यापकांकडून शिक्षकांसाठी नमुनापाठ घेण्याचे प्रमाण खालीलप्रमाणे होते.

अ) दोनवेळा 12.82 %

ब) पाचवेळा 11.55 %

क) आठवेळा 10.25 %

ड) दहावेळा 65.38 %

13) शिक्षक अध्यापनात शैक्षणिक साधनांचा वापर करतात असे 89.94 % मुख्याध्यापकांचे म्त आहे.

14) शिक्षक अध्यापनात शैक्षणिक साधनांचा वापर करीत नाहीत असे 10.20 % मुख्याध्यापकांचे मत होते.

15) शिक्षक अध्यापनात शैक्षणिक साधनांचा वापर करित नाहीत. असे 10.20 % मुख्याध्यापकांचे मत होते.

16) शैक्षणिक साधनांचा वापर अध्यापनात करणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण जास्त (89.94 % ) होते.

17) 80.76 % मुख्याध्यापकांच्या मते अभ्यासक्रम नियोजनाप्रमाणे वेळेत पूर्ण होतो तर 19.24 % मुख्याध्यापकांच्या मते तो नियोजनाप्रमाणे वेळेत पूर्ण होत नाही.

18) वेळेत अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी 19.24 % मुख्याध्यापक प्रयत्नशील असुन खालील उपाय करीत होते.

अ) उपचारात्मक :- 73.08 %

1) ज्यादा तास घेणे

2) अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी पाठपुरावा करणे.

ब) दंडात्मक :- 14.10 %

1) तोंडी सूचना देणे

2) कारणे दाखवा नोटीस देणे

क) अनुत्तरीत :- 12.82 %

19) 87.18 % मुख्याध्यापकांचे मत शिक्षक मुख्यालयात राहतात तर 12.82 % मुख्याध्यापकांच्या मते शिक्षक मुख्यालयात राहत नाहीत.

20) 100 % मुख्याध्यापक शिक्षकांची मासिक सभा घेतात, असे दिसून आले.

21) प्रतिसादक मुख्याध्यापक शिक्षकांच्या मासिकसभेत खालील बाबींचा आढावा घेतात, असे दिसुन आले.

अ) शालेय अध्यायन -अध्यापन कामकाजाचा आढावा घेणे.

ब) अभ्यासक्रम पुर्ततेचा आढावा घेणे.

क) विद्यार्थ्यांची उपस्थिती, गुणवत्ता वाढ याविषयी चर्चा करणे.

ड) शालेय व शिक्षकांच्या अडचणी जाणुन घेणे.

इ) परिपत्रके शिक्षकांच्या निदर्शनास आणणे.

फ) शैक्षणिक वापर तयार करणे व त्याच्या वापराविषयी चर्चा करणे.

22) 100 % मुख्याध्यापक शिक्षकांना प्रशिक्षणासाठी पाठवित होते.

23) प्रतिसादक मुख्याध्यापकांनी, शिक्षकांनी शाळा सुरु अस्ताना प्रशिक्षणात पाठविल्यास होणारे परिणाम पुढीलप्रमाणे स्पष्ट केले होते.

अ) अध्यापनांचे काम व्यवस्थित होत नाहीत.

ब) शिक्षकांचा अभ्यासक्रम, मागे राहतो, पुर्ण होत नाही.

क) वर्ग विषय दुर्लक्षिला जातो.

ड) वर्ग एकत्रित करावे लागतात.

इ) विद्यार्थी उपस्थिती कमी होते.

6.06 **विद्यार्थ्यांविषयी निष्कर्ष :-**

1) 100 % मुख्याध्यापक उशीरा शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांस शिक्षा करतात, असे दिसुन आले.

2) प्रतिसादक मुख्याध्यापक विद्यार्थ्यांना पुढीलप्रमाणे शिक्षा करतात असे दिसुन येते.

अ) उशीर का झाला याची शहानिशा केली जाते.

ब) उश्रिरा न येण्याविषयी समजावून सांगितले जाते.

क) पालकांस सुचना दिली जाते.

ड) शारिरीक शिक्षा व व्यायाम दिला जातो.

3) प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या 100 % पटनोंदणी साठी प्रतिसादक मुख्याध्यापक पुढील प्रमाणे प्रयत्न करीत होते.

अ) प्रवेश पात्र विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करणे.

ब) पालक भेटी घेणे.

क) पटनोंदणी सप्ताह, शैक्षणिक दिंडी काढणे.

ड) ग्रामशिक्षण सभा व मातृप्रबोधन योजना राबविणे.

4) अभ्यास मागे पडलेल्या विद्यार्थ्यांसाठी प्रतिसादक मुख्याध्यापक प्रयत्नशील असून ते खालील प्रमाणे प्रयत्न करीत होते.

अ) ज्यादा तास घेणे.

ब) पालकांना वैयक्तिक अभ्यासकडे लक्ष देण्यास सांगणे.

क) विद्यार्थ्यांकडे विशेष लक्ष पुरविणे व त्यांचा सराव करुन घेणे.

ड) स्वाध्याय देणे व दिलेल्या अभ्यासाबाबत चौकशी करणे.

इ) हुशार विद्यार्थ्यांशी जोडी लावून देणे.

5) प्रतिसादक मुख्याध्यापक विद्यार्थांमध्ये शाळेची आवड निर्माण होण्यासाठी पुढील प्रमाणे कार्यक्रम राबवित होते.

अ) राष्ट्रीय सण, थोर पुरुषांच्या जयंत्या व पुण्यतिथी साजरी करणे.

ब) मध्यान्ह जेवणायची व्यवस्था करणे.

क) सांस्कृतिक कार्यक्रम व खेळांचे आयोजन करणे.

ड) प्रभावी व हसत खेळत अध्यापन करणे.

इ) विविध स्पर्धांचे आयोजन करणे.

फ) दूरदर्शन वरील शैक्षणिक कार्यक्रम दाखविणे.

6) शाळेच्या गुणवत्ता विकासासाठी मुख्याध्यापक खालील प्रमाणे प्रयत्नशील होते असे दिसून आले.

अ) ज्यादा तास घेणे.

ब) सर्वांगीण विकासासाठी प्रोत्साहन व बक्षिस देणे.

क) शिक्षकांना आवश्यक सूचना व मार्गदर्शन करणे.

ड) किमान अध्ययन क्षमता प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करणे.

इ) खेळांचे सामने आयोजित करणे.

फ) शैक्षणिक साहित्याचा वापर करुन प्रभावी अध्यापन करणे.

7) उस्मानाबाद तालुक्यातील, 6 ते 14 वयोगटातील सार्वत्रिक, मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षण कायद्याची अंमलबजावणी केली जाते असे 88.46 % मुख्याध्यापकांचे मत होते तर या कायद्याची अंमलबजावणी केला जात नाही असे 11.54 % मुख्याध्यापकांचे मत होते.

8) प्रतिसादक मुख्याध्यापकांनी शिक्षकांना अध्यापनाशिवाय इतर कामे करावी लागत असल्याचे स्पष्ट केले.

अ) मतदार यादी बनविणे.

ब) कुटूंब नियोजन कार्यक्रम सहभाग घेणे.

क) जनगणना करणे.

ड) निवडणुकीचे प्रत्यक्ष काम करणे.

इ) दारिद्र्य रेषेखालील लोकांचे सर्वेक्षण करणे.

ई) पल्स पोलिओ कार्यक्रमात सहभाग घेणे.

फ) पशुगणना करणे.

ग) साक्षरता अभियानात सहभाग घेणे.

घ) ग्राम सफाई अभियान राबविणे.

च) ग्राम अभियान कार्यक्रमात सहभाग घेणे.

छ) दुध तापविणे, भात शिजविणे ( सकस आहार योजना )

द) अल्प बचत योजनेत सहभाग घेणे.

9) प्रतिसादक मुख्याध्यापकांचे स्वतः दिवसातून अध्यापन करण्याचे प्रमाण पुढील प्रमाणे होते असे दिसून आले.

अ) तीन तास – 32.05 %

ब) चार तास – 12.82 %

क) सहा तास – 24.64 %

ड) आठ तास – 29.49 %

10) प्राथमिक शाळांचे मुख्याध्यापक स्वतः अध्यापनांचे कार्य करतात

11) प्रतिसादक मुख्याध्यापकांचे विद्यार्थ्यांसाठी वैयक्तिक उपक्रम आयोजित करण्याचे प्रमाण पुढील प्रमाणे होते हे स्पष्ट केले.

अ) हस्ताक्षर स्पर्धा – 100 %

ब) चित्रकला स्पर्धा – 87.18 %

क) रांगोळी स्पर्धा – 87.18 %

ड) वक्तृत्व स्पर्धा – 88.46 %

इ) विज्ञान उपकरण स्पर्धा – 37.18 %

फ) इतर उपक्रम – वैयक्तिक खेळ – 41.03 %

12) उस्मानाबाद तालुक्यातील 55.12 % मुख्याध्यापक विद्यार्थ्यांची वर्षातून एकवेळा आरोग्य तपासणी करून घेत होते तर 44.88 % मुख्याध्यापक विद्यार्थ्यांची दोनवेळा आरोग्य तपासणी करून घेत होते.

13) प्रतिसादक मुख्याध्यापकांचे विद्यार्थ्यांसाठी सामुदायिक उपक्रम आयोजित करण्याचे प्रमाण पुढील प्रमाणे होते हे स्पष्ट केले.

अ) आवार सफाई – 100 %

ब) सामुदायिक भोजन– 100 %

क) शालेय बाग तयार करणे – 46.15 %

ड) बालक दिन – 100 %

इ) स्वातंत्र्य दिन – 100 %

**6.07 भौतिक सुविधा व शालेय परिसर या विषयी निष्कर्ष**

1) उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शाळांच्या इमारतींचे प्रमाण प्रतिसादक मुख्याध्यापकांनी पुढील प्रमाणे असल्याचे स्पष्ट केले होते.

अ) पक्की – 39.74 %

ब) अर्धी पक्की – 39.74 %

क) कच्ची – 15.38 %

ड) टीन शेड –5.14 %

2) प्रतिसादक मुख्याध्यापकांनी प्राथमिक शाळांच्या इमारतींची मालकी प्रमाण खालील प्रमाणे होते असे स्पष्ट केले.

अ) जिल्हा परिषद – 67.69 %

ब) नगर परिषद – 14.10 %

क) खाजगी संस्था – 8.97 %

ड) भाड्याने – 8.97 %

3) उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शाळांना पुरेशा वर्ग खोल्या आहेत असे 47.43 % मुख्याध्यापकांचे मत होते.

4) 52.56 % मुख्याध्यापकांच्या मते वर्ग खोल्या पुरेशा नाहीत.

5) उस्मानाबाद तालुक्यात प्राथमिक शाळांना पुरेशा वर्ग खोल्या उपलब्ध नाहीत.

6) उस्मानाबाद तालुक्यातील 44.87 % प्राथमिक शाळांमध्ये फर्निचरची उपलब्धता पुरेशी आहे.

7) 55.13 % प्राथमिक शाळामध्ये पुरेसे फर्निचर उपलब्ध नाहीत.

8) उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शाळेतील पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेविषयीचे प्रमाण प्रतिसादक मुख्याध्यापकांनी पुढील प्रमाणे असल्याचे स्पष्ट केले.

अ) हातपंप – 6.41%

ब) विहीर – 0.00 %

क) नळयोजना – 55.13 %

ड) कांहीही सोय नाही – 38.46 %

9) 38.46 % प्राथमिक शाळांना पिण्याच्या पाण्याची कोणतीही सोय उपलब्ध नाही.

10) 43.59 % प्राथमिक शाळांना मुख्याध्यापकासाठी स्वतंत्र खोलीची व्यवस्था होती.

11) 56.41 % प्राथमिक शाळांना मुख्याध्यापकासाठी स्वतंत्र खोलीची व्यवस्था नव्हतो.

12) 19.23 % प्राथमिक शाळांना शिक्षकांसाठी स्वतंत्र खोलीची व्यवस्था होती.

13) 80.77 % प्राथमिक शाळांना शिक्षकांसाठी स्वतंत्र खोलीची नव्हती.

14) उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शाळांकडे पुढील प्रमाणे शैक्षणिक शाधानांची उपलब्धता होती.

अ) दूरदर्शन संच - 32.05 %

ब) रेडिओ - 38.46 %

क) टु-इन-वन - 48.72 %

ड) गणित पेटी - 52.56 %

इ) विज्ञान पेटी - 61.54 %

ई) तक्ते - 73.07 %

फ) नकाशे - 82.05 %

15) उस्मानाबाद तालुक्यातील 51.28 % प्राथमिक शाळांना स्वतःचे क्रिडांगण आहे.

16) 48.72 % प्राथमिक शाळांना स्वतः चे क्रिडांगण नाही.

**6.08 केंद्रप्रमुखांच्या मुलाखतीचे निष्कर्ष**

1) उस्मानाबाद तालुक्यातील 71.52 % केंद्रप्रमुख पदवीधर प्रशिक्षित असून 28.48 % केंद्रप्रमुख पदव्युत्तर पदवीधारक असुन ते प्रशिक्षित होते.

2) समुहातील प्राथमिक शाळांची पटनोंदणी वाढविण्यासाठी प्रतिसादक केंद्रप्रमुख पुढील प्रमाणे योजना राबवित होते.

अ) पटनोंदणी संदर्भात सर्वेक्षण करणे - 100 %

ब) पटनोंदणी अहवाल तयार करणे - 71.42 %

क) शाळा निहाय सरासरी दाखविणारे तक्ते - 35.71 %

ड) शाळा सोडून जाणाऱ्याची माहिती ठेवणे - 85.71 %

इ) कमी उपस्थिती असणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती ठेवणे - 64.44 %

ई) पालकसभा घेणे - 85.71 %

3) समूहातील शाळांची गळती रोखण्यासाठी प्रतिसादक केंद्रप्रमुख खालील प्रमाणे योजना राबवितात. त्याचे प्रमाण खालील प्रमाणे आहे.

अ) शालेय पोषण आहार योजना - 100%

ब) गणवेष व लेखन साहित्य वाटप - 71.44 %

क) पुस्त पेढी - 50.00 %

ड) मुलींना उपस्थिती भत्ता - 85.71 %

4) शिक्षक पाठटाचण काढतात असे 71.42 % केंद्रप्रमुखांचे मत आहे तर 28.58 % केंद्रप्रमुख्याच्या मते शिक्षक पाठटाचण काढत नाहीत.

5) 57.14 % केंद्रप्रमुख शिक्षकांच्या नियमित उपस्थिती बाबत पडताळणी करतात. 42.82 % केंद्रप्रमुख शिक्षकांच्या नियमित उपस्थिती बाबत पडताळणी करीत नाहीत.

6) प्राथमिक शाळांना भेट दिल्यानंतर दिलेल्या सूचनांची नोंद स्वतंत्र नोंद वहीत ठेवणाऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 78.57 % होते.

7) 21.43 % केंद्रप्रमुख सूचनांची नोंद स्वतंत्र नोंदवहीत ठेवत नाहीत .

8) 100 % केंद्रप्रमुख शाळा तपासणी नंतर शिक्षक, मुख्याध्यापक यांच्याशी चर्चा करीत होते.

9) विद्यार्थ्यांनी आत्मसात केलेल्या किमान अध्ययन क्षमतेवरुन शिक्षकांचे मूल्यमापन करण्याऱ्या केंद्रप्रमुखांचे प्रमाण 85.71 % होते तर 14.29 % केंद्रप्रमुख शिक्षकांचे मूल्यमापन करीत नाहीत.

10) 21.43 % केंद्रप्रमुख समूहातील शाळांना महिन्यातून एकवेळा भेट देत होते.

11) 57.14 % केंद्रप्रमुख महिन्यातून दोनवेळा प्राथमिक शाळांना भेटी देत होते तर 21.43 % केंद्रप्रमुख महिन्यातुन तीनवेळा प्राथमिक शाळांना भेटी देतात असे आढळून आले.

12) 71.43 % केंद्रप्रमुख आठवड्यातून चार तास अध्यापन करीत होते तर सहा तास अध्यापन करण्याऱ्या केंद्रप्रमुखांचे

प्रमाण 28.57 % होते असे आढळून आले.

13) प्रतिसादक केंद्रप्रमुखांकडून भेटीच्या वेळी शिक्षकांच्या कामाची पडताळणी करण्याचे प्रमाण पुढीलप्रमाणे होते असे आढळुन आले.

अ) अध्यापन पुर्व तयारी – 85.71 %

ब) अध्यापन कार्य – 100 %

क) शैक्षणिक साधनांचा वापर – 64.29 %

ड) विद्यार्थ्यांचा प्रतिसाद – 57.14 %

इ) गृहपाठ – 71.43 %

14) समूहातील प्राथमिक शाळांचा दर्जा उंचाविण्यासाठी प्रतिसादक केंद्रप्रमुख करीत असलेल्या प्रयत्नांचे प्रमाण पुढील प्रमाणे आहेत.

अ) चर्चासत्रे – 85.71 %

ब) शिबीरे – 71.43 %

क) गटसंम्मेलन – 100 %

ड) कृतिसत्र – 57.14 %

**6.09 शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांच्या मुलाखतीचे निष्कर्ष**

1) उस्मानाबाद तालुक्यातील प्रतिसादक शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांत एस. एस. सी. ज्यु. पी. टी. सी. व एस. एस. डी. एड्. असणाऱ्यांचे प्रमाण 42.86 % होते तर प्राथमिक पदवीधर (बी. ए. डी. एड्. ) शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 28.58% होते.

2) पदवीधर प्रशिक्षित असणाऱ्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 28.56 % होते.

3) शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचा सरासरी अनुभव दहा वर्षे असल्याचा दिसून आला.

4) पाच वर्षे प्रशासनाचा अनुभव असलेल्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 28.57 % होते.

5) दहा वर्षे प्रशासनाचा अनुभव असलेल्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 28.57 % होते.

6) पंधरा वर्षे प्रशासनाचा अनुभव असलेल्या शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण 42.85 % होते.

7) शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांना बीट अंतर्गत सरासरी अठरा शाळांचे काम पहावे लागत होते.

8) प्रतिसादक शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांच्या बीट अंतर्गत येणाऱ्या प्राथमिक शाळांचे प्रमाण पुढील प्रमाणे असल्याचे दिसुन आले.

अ) उस्मानाबाद ग्रामीण – 16.13 %

ब) तेरणानगर – 14.52 %

क) येडशी – 13.70 %

ड) तेर – 14.52 %

इ) कामेगांव – 16.34 %

ई) वावी – 12.90 %

फ) बेंबळी – 12.09 %

9) 57.14 % शिक्षणविस्तार अधिकारी शिक्षकांच्या बदल्याबाबत शिफारस करतात तर 42.86 % शिक्षण विस्तार अधिकारी शिक्षकांच्या बदल्याबाबत शिफारस करीत नाहीत.

10) प्राथमिक शाळेतील शाळागृह व साहित्य दुरुस्तीबाबत वरिष्ठाकडे शिफारस केली जाते असे 71.43 % शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे मत होते. 28.57 % विस्तार अधिकारी शाळागृह व साहित्य दुरूस्तीबाबत शिफारस करीत नसल्याचे आढळुन आले.

11) बीट मधील प्राथमिक शाळांसाठी पुरेसे शिक्षक आहेत असे 57.14 % शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे मत होते तर 42.86% शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांच्या मते प्राथमिक शाळांसाठी पुरेसे शिक्षक उपलब्ध नाहीत.

12) उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक शाळासाठी पुरेसे शिक्षक नाहीत.

13) 28.57 % शिक्षण विस्तार अधिकारी शाळा भेटींच्या वेळी ग्रामशिक्षण समितीच्या अध्यक्ष व सदस्यांशी चर्चा करीत असल्याचे आढळुन आले.

14) 71.43 % शिक्षण विस्तार अधिकारी शाळा भेटीच्या वेळी ग्रामशिक्षण समितीच्या अध्यक्ष व सदस्यांशी भेटुन चर्चा करीत नाहीत असे दिसुन आले. चर्चा न करण्याऱ्या शिक्षणविस्तार अधिकाऱ्यांचे प्रमाण जास्त होते.

15) प्रतिसादक शिक्षणविस्तार अधिकारी समाजाचा प्राथमिक शिक्षणामध्ये सहभाग वाढविण्यासाठी प्रयत्नशील असुन त्याचे प्रमाण पुढील प्रमाणे असल्यांचे दिसुन आले.

अ) शैक्षणिक उठाव - 71.43 %

ब) शिक्षक पालक संघ - 85.77 %

क) मातृप्रबोधन - 57.14 %

ड) जाणीव जागृती - 42.86 %

16) 100 % शिक्षण विस्तार अधिकारी गटसंम्मेलनात शिक्षकांना मार्गदर्शन करतात असे दिसुन आले.

17) प्रतिसादक शिक्षणविस्तार अधिकारी गटसंम्मेलनात शिक्षकांना पुढील बाबीवर मार्गदर्शन करीत होते.

अ) क्षमता चाचण्या विषयी मार्गदर्शन

ब) निबंध, स्वाध्याय या विषयी मार्गदर्शन

क) नवीन साहित्य निर्मीतीसाठी मार्गदर्शन

ड) शासनाच्या विविध योजनांची माहिती देणे व अंमलबजावणीसाठी मार्गदर्शन

18) प्रतिसादक शिक्षणविस्तार अधिकारी आपल्या बीट मधील वेगवेगळी प्रशासकीय कामे करतात त्याचे प्रमाणे पुढील प्रमाणे होते.

अ) पेन्शन प्रकरणे - 71.43 %

ब) वसुलीची रकमेबाबत - 57.14 %

क) शासकीय योजना - 85.77 %

ड) भाडे प्रकरण - 42.85 %

इ) भविष्य निर्वाह निधी बाबत - 71.43 %

ई) दिर्घ मुदतीच्या रजेबाबत - 100 %

19) 100 % शिक्षण विस्तार अधिकारी केंद्रप्रमुखांचे गोपनीय अहवाल लिहीतात त्याच बरोबर मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या गोपनीय अहवालांचे पुनर्विलोकन करतात असे दिसुन आले.

20) प्रतिसादक शिक्षणविस्तार अधिकाऱ्यांकडुन वर्षभरातुन होणाऱ्या प्राथमिक शाळांच्या तपासणीचे प्रमाण पुढील प्रमाणे असल्याचे दिसुन आले होते.

अ) दोनवेळा - 28.47 %

ब) तीनवेळा - 57.43 %

क) चारवेळा- 14.10 %

21) 85.77 % शिक्षणविस्तार अधिकारी शाळा तपासणी नंतर शिक्षकांची बैठक घेतात तर 14.23 % शिक्षण विस्तार अधिकारी बैठक घेत नाहीत असे दिसुन आले.

22) 71.43 % शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांच्या मते, शाळा तपासणीच्या वेळी दिलेल्या सुचनानंची कार्यवाही केली जाते तर 28.57 % शिक्षणविस्तार अधिकाऱ्यांचे मते सुचनांची कार्यवाही केली जात नाही असे आढळुन आले.

23) प्रतिसादक शिक्षणविस्तार अधिकारी शालेय अभिलेख तपासणी करताना खालील अभिलेख तपासतात त्यांचे प्रमाण पुढीलप्रमाणे होते.

अ) प्रत्यक्ष पटपडताळणी - 57.14 %

ब) पगार वाटप रजिस्टर - 71.43 %

क) विद्यार्थ्यांचे दैनंदीन उपस्थितीपट – 100 %

ड) परिपत्रक संचिका – 85.77 %

इ) सूचना वही – 42.85%

ई) जमा खर्च, कॅशबुक, खतावणी रजिस्टर – 100 %

5. शिक्षक, मुख्याध्यापक व इतर कर्मचारी यांची खातेनिहाय चौकशी शिक्षणविस्तार अधिकाऱ्यांमार्फत होते असे 100 % शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांचे मत होते.

6.10 **गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या मुलाखतीचे निष्कर्ष**

1) सर्व प्राथमिक शिक्षकांना वेळेवर वेतनवाढ दिली जाते असे गटशिक्षणाधिकाऱ्यांचे मत आहे.

2) गटशिक्षणाधिकाऱ्यांना शैक्षणिक कामापेक्षा, प्रशासकीय कामाचा बोजा जास्त असल्याचे आढळुन आले.

3) गटशिक्षणाधिकारी शैक्षणिक योजना प्रभावीपणे राबवितात असे दिसून आले.

4) प्राथमिक शाळांना भेटीच्या वेळी, गटशिक्षणाधिकारी प्राथमिक शाळांचे केंद्रप्रमुख व केंद्रीय मुख्याध्यापक यांचे आर्थिक व्यवहार तपासतात असे दिसून आले.

5) महिन्यातून 22 प्रा. शाळांना गटशिक्षणाधिकारी भेट देतात असे आढळून आले.

6) आदर्श शिक्षक निवडीसाठी व वेतन वाढीसाठी गटशिक्षणाधिकारी शिफारस करीत असल्याचे आढळुन आले.

7) शिक्षक अनधिकृतपणे अनुपस्थित राहिल्यास त्याची माहिती गटशिक्षणाधिकारी वरिष्ठांकडे पाठवितात असे आढळुन आले.

8) प्राथमिक शाळा मान्यतेचे प्रस्ताव गटशिक्षणाधिकाऱ्यामार्फत जातात असे दिसून आले.

9) गटशिक्षणाधिकाऱ्यांना प्राथमिक शिक्षणासंबंधी विविध बैठकांना उपस्थिक रहावे लागते असे दिसुन आले.

6.11 **प्राथमिक शाळांना दिलेल्या भेटी व निरीक्षणातील निष्कर्ष**

1) 20% प्राथमिक शाळां च्या इमारती सुस्थितीत असून त्यावर स्लॅब होता.

2) 88 % प्रथमिक शाळांच्या इमारतीवर पत्रे होते.

3) 20 % प्राथमिक शाळां गावापासुन वाजवी अंतरावर होत्या.

4) 50 % प्राथमिक शाळांना पुरेशा वर्ग खोल्या होत्या.

5) 20 % प्राथमिक शाळांमध्येच पिण्याच्या पाण्याची सोय होती.

6) 20 % प्राथमिक शाळाच हवेशीर वातावरणात होत्या.

7) सर्व प्राथमिक शाळातून वेळापत्रके होती.

8) अभ्यासक्रम नियोजन, घटक नियोजन व वार्षिक नियोजन करणाऱ्या प्राथमिक शाळांचे प्रमाण 80 % होते.

9) 50 % वर्ग खोल्या स्वच्छ होत्या.

10) वर्ग खोल्या कोंदट, पुरेशा सुर्यप्रकाश न येणाऱ्या व हवा न येणाऱ्या होत्या.

11) 80 % प्राथमिक शाळांमधून भिंती बोलक्या होत्या.

12) 70 % प्राथमिक शाळांना पुरेसे फर्निचर नव्हते.

13) 80 % प्राथमिक शाळांना खेळाचे मैदान उपलब्ध नव्हते.

## विभाग " ब "

## शिफारसी

### 6.12 **मुख्याध्यापकांच्या वैयक्तिक माहिती विषयक शिफारशी :-**

1) प्राथमिक शाळांच्या मुख्याध्यांपकांच्या शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता द्वितीय श्रेणीतील पदवी आणि प्रशिक्षित अशी व्यक्ती

2) अशिक्षित व्यक्तींची मुख्याध्यापक म्हणून नेमणूक करु नये.

3) प्राथमिक शाळांसाठी कायमस्वरुपी मुख्याध्यापकाची नेमणूक करण्यात यावी.

4) प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापक पदी नेमणूक होणाऱ्या व्यक्तींचा किमाण 5 वर्षाचा प्राथमिक शाळांना अध्यापनाचा अनुभव असावा.

### 6.13 **प्राथमिक शाळांच्या माहिती संबंधी शिफारशी**

1) शहरी भागात प्राथमिक शाळांचे प्रमाण वाढविम्यात यावे.

2) फक्त मुलींसाठीच्या प्राथमिक शाळांचे प्रमाण वाढविण्यात यावे

3) कनिष्ठ प्राथमिक शाळांचा स्तर वाढवून त्याठिकानी वरिष्ठ प्राथमिक शाळा सुरु करण्यात याव्यात.

4) खाजगी संस्थेमार्फत चालविल्या जाणाऱ्या प्राथमिक शाळांना शासनाने जास्तीत जास्त मान्यता द्यावी.

5) प्राथमिक शाळामध्ये मुलींचे प्रमाण वाढण्यासाठी, जाणिवपूर्वक प्रयत्न करावेत.

6) प्राथमिक शाळामधील गळती रोखण्यासाठी ठोस पावले उचलावित. विशेषतः ग्रामीण भागातील मुलांची गळती रोखण्यात यावी.

7) प्राथमिक शाळामध्ये स्त्री शिक्षकांचे प्रमाण वाढविण्यात यावे.

### 6.14 **कार्यालयीन कामकाज व शालेय दप्तर विषयक शिफारशो**

1) प्राथमिक शाळेतील उशिरा येणाऱ्या शिक्षकांसाठी सर्वच शाळांनी लेट मस्टर ठेवावे.

2) प्राथमिक शाळांमध्ये येणारी पुस्तके, मासिके यांची स्वतंत्र नोंद ठेवण्यात यावी.

3) प्राथमिक शाळेतील वर्षभरातील किरकोळ दुरुस्तीची नोंद ठेवण्यात यावी.

4) प्राथमिक शाळांच्या सर्वच मुख्याध्यापकांनी ग्रामशिक्षण समितीच्या कार्यविषयक अहवालाच्या नोंदी ठेवाव्यात.

5) प्राथमिक शाळांच्या मुख्याध्यापकांनी वेळोवेळी रोजकिर्द व खतावणी लिहाव्यात.

6) शासनाने प्राथमिक शाळांना पुरेसे अनुदान द्यावे.

7) प्राथमिक शिक्षण विषयक योजना मुख्याध्यापकांनी कार्यक्षम पणे राबवाव्यात व या योजनांसाठी समाजाचा सहभाग घ्यावा.

6.15 **प्राथमिक शाळांच्या शिक्षकांविषयी शिफारशी**

1) सर्वच प्राथमिक शाळांसाठी सर्व विषयांस पुरेसे शिक्षक उपलब्ध करुन द्यावेत.

2) मुख्याध्यापकांनी प्रत्येक शिक्षकांचे महिन्यातून तीन वेळा पाठ निरीक्षण करावे.

3) मुख्याध्यापकांनी शिक्षकांचे पाठ निरीक्षण करताना, शिक्षकांचे अध्यापन कार्य व त्यांच्या विषयाच्या तयारीवर भर द्यावा.

4) पाठ निरीक्षणा नंतर मुख्याध्यापकांनी शिक्षकांना त्याच्या अडचणी सोडविण्यासाठी मार्गदर्शन करावे व त्यांना प्रोत्साहन द्यावे.

5) मुख्याध्यापकांनी शिक्षकासाठी वर्षातून पाच नमूना पाठ घ्यावेत.

6) शिक्षकांनी अध्यापनात शैक्षणिक साधनांचा वापर करावा यासाठी मुख्याध्यापकांनी शिक्षकांना सूचना व मार्गदर्शन करावे.

7) नियोजना प्रमाणे अभ्यास क्रम पूर्ण करण्यासाठी मुख्याध्यापक व शिक्षकांनी प्रयत्न शिल रहावे.

8) मुख्याध्यापकांनी सर्वच शिक्षकांना मुख्यालयास राहणे सक्तीचे करावे. शिक्षक मुख्यालयास रहात नसल्यास त्या शिक्षकाचे घरभाडे भत्ता मासिक पगारातून कपात करावा व वरिष्ठांना त्याची माहिती कळवावी.

9) मुख्याध्यापकांनी शाळासुरु असताना शिक्षकांस प्रशिक्षणासाठी पाठवू नये. वरिष्ठांना शाळासुरु असताना प्रशिक्षणास पाठविल्यास शाळेचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे समजावून सांगावे. शिक्षकांना फक्त सुट्टीच्या काळातच प्रशिक्षणास पाठवावे.

6.16 **विद्यार्थ्यांविषयी शिफारशी**

1) प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या 100% पटनोंदणी साठी मुख्याध्यापक, शिक्षक व समाज यांनी मिळून प्रयत्न करावेत.

2) अभ्यासात मागे पडलेल्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षक, मुख्याध्यापक व पालक यांनी प्रयत्न करावेत.

अशा मुलांसाठी मुख्याध्यापकांनी शिक्षकांनी जादा तासांचे आयोजन करावे.

3) 6 ते 14 वयोगटातील मुलांसाठी मुख्याध्यापकांनी प्राथमिक शिक्षण कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. प्राथमिक शिक्षण हा प्रत्येक मुलाचा मूलभूत हक्क समजण्यात यावा. त्यासाठी शासनाने कायद्यात तरतूद करावी.

4) शासनाने प्राथमिक शिक्षकांना अध्ययन अध्यापनाशिवाय कोणतेही इतर कामे लावू नयेत.

5) प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापकांनी दिवसातून चार तास अध्यापन करावे.

6) प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची वर्षातून दोन वेळा आरोग्य तपासणी केली जावी.

### 6.17 भौतिक सुविधा व शालेय परिसर विषयक शिफारशी

1) उस्मानाबाद तालुक्यातील सर्वच प्राथमिक शाळांना पक्क्या व स्वतंत्र इमारती असाव्यात .

2) सर्वच प्राथमिक शाळांना पुरेश्या वर्ग खोल्या असाव्यात.

3) प्राथमिक शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या प्रमाणानुसार पुरेश्या प्रमाणात फर्निचरचा पुरवठा असावा.

4) सर्वच प्राथमिक शाळांना पिण्याच्या पाण्याची सोय असावी. शाळांना पिण्याच्या पाण्याची सोय करण्यासाठी शासनाने अनुदान द्यावे. त्याच प्रमाणे मुख्याध्यापकांनी गावकऱ्यांच्या मदतीने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था होण्यासाठी प्रयत्न करावेत.

5) शासनाने प्रत्येक प्राथमिक शाळेमध्ये मुख्याध्यापक खोली व शिक्षकांसाठी स्वतंत्र खोली उपलब्ध करुन द्यावी. त्याच बरोबर शिक्षक व मुख्याध्यापकांनी समाजातील दानशूर व्यक्तीकडून व समाजातून निधी जमा करुन स्वतंत्र खोली बांधण्यासाठी प्रयत्न करावेत. कारण प्रत्येक गोष्टीसाठी शासन अनुदान देऊ शकणार नाही.

6) प्राथमिक शाळेमध्ये पुरेशी शैक्षणिक साधने उपलब्ध करुन द्यावित.

7) सर्वच प्राथमिक शाळांना स्वत:चे क्रिडांगण असावे त्यासाठी शासनाने जागा उपलब्ध करुन द्यावी त्याच प्रमाणे शिक्षक, मुख्याध्यापक यांनी या कामी समाजाची मदत घेऊन क्रिडांगणासाठी जागा मिळविण्याचे प्रयत्न करावेत.

6.18 **केद्रप्रमुखांच्या मुलाखतीतील माहितीविषयक शिफारशी**

1) समुहातील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची गळती रोखण्यासाठी केंद्रप्रमुखानी शासकीय योजना प्रभावीपणे राबवाव्यात.

2) समुहातील सर्वच शिक्षकांना दररोज पाठ टाचन काढण्यासाठी सूचना द्याव्यात. जर सूचना देऊन ही शिक्षक पाठ टाचन काढत नसल्यास नियमा प्रमाणे त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करावी.

3) शिक्षकांच्या नियमीत उपस्थितीबाबत केंद्रप्रमुखानी पडताळणी करावी.

4) प्राथमिक शाळांना भेट दिल्यानंतर त्याची नोंद केंद्रप्रमुखानी स्वतंत्र नोंदवहीत ठेवावी.

5) प्राथमिक शाळांच्या केंद्रप्रमुखानी शिक्षकांचे, विद्यार्थ्यांनी आत्मासात केलेल्या किमान अध्ययन क्षमते वरुन मुल्यमापन करावे. विद्यार्थ्यांनी कितपत क्षमता आत्मासात केल्या यावरुन शिक्षकांच्या अध्यापन कार्याविषयी मुल्यमापन करता येईल.

6) प्रत्येक केंद्रप्रमुखानी महिन्यातून किमान दोन वेळा आपल्या समुहातील प्राथमिक शाळांना भेटी द्याव्यात व अध्ययन अध्यापन कार्य व्यवस्थितपणे चालेल याची काळजी घ्यावी.

7) केंद्रप्रमुखांनी आठवड्यातून चार तास अध्यापन करावे.

8) केंद्रप्रमुखांनी समुहातील प्राथमिक शाळांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी शिक्षक, मुख्याध्यापकांचे सहकार्य घ्यावे व शाळेचा दर्जा सुधारावा. विशेषतः ग्रामीण भाग व लमाण तांडे याठिकाणच्या प्राथमिक शाळांकडे विशेष लक्ष द्यावे. त्यासाठी समुहातील शाळांसाठी वेगवेगळे उपक्रम राबवावेत.

6.19 **शिक्षण विस्तार अधिकारी यांच्या मुलाखतीतील माहिती विषयक शिफारशी**

1) शिक्षणविस्तार अधिकाऱ्यांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता कमीतकमी द्वितीय श्रेणीतील पदवी प्रशिक्षित असावी. प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक व केंद्रप्रमुख यांच्या पेक्षा शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता जास्त असावी.

2) शिक्षणविस्तार अधिकाऱ्यांना अध्यापनाचा 10 वर्षाचा अनुभव असावा अशाच व्यक्तिची शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून नेमणुक करावी.

3) शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांना बीट अंतर्गत फक्त 10 शाळांची काम असावे. बीट अंतर्गत जास्त शाळा असू नयेत.

4) शिक्षण विस्तार अधिकाऱ्यामार्फतच शिक्षकांच्या बदली बाबत शिफारस व्हावी. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शिक्षकांची बदली करताना शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांची शिफारस व मत याचा विचार करुनच बदल्या कराव्यात.

5) शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांनी शाळागृह व साहित्य दुरुस्ती बाबत योग्य ती शिफारस वरिष्ठांकडे करावी व वरिष्ठांनी या शिफारशीचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन त्यास लवकरात लवकर मान्यता द्यावी.

6) सर्वच शिक्षणविस्तार अधिकाऱ्यांनी ग्रामीण भागातील शाळाभेटीच्या वेळी ग्रामशिक्षण समितीचे अध्यक्ष व सदस्यांशी चर्चा करावी. शाळेच्या अडीअडचणी विषयी चर्चा करावी. त्याच बरोबर शाळेची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी त्यांचे सहकार्य मिळवावे. शाळा हा समाजाचाच घटक आहे याची जाणिव त्यांच्या मध्ये निर्माण करावी.

7) विस्तार अधिकाऱ्यांनी प्राथमिक शिक्षण समाजातील सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहंचण्यासाठी समाजाचे सहकार्य घ्यावे व त्यांचा प्राथमिक शिक्षणातील सहभाग वाढवावा.

8) शिक्षक व कर्मचाऱ्यांची प्रशासकीय कामे शिक्षणविस्तार अधिकाऱ्यांनी लवकर पूर्ण होतील याकडे काळजीपूर्वक लक्ष द्यावे व त्याचा सतत पाठपुरावा करावा. विशेषत: शिक्षकांच्या आर्थिक अडचणी लवकर सोडवाव्यात.

9) शिक्षणविस्तार अधिकाऱ्यांनी केंद्रप्रमुखांची गोपनीय अहवाल लिहितांना व शिक्षक, मुख्याध्यापकांच्या गोपनीय अहवालांचे पुनर्विलोकन करताना वस्तुनिष्ठपणे विचार करावा.

10) शिक्षणविस्तार अधिकाऱ्यांनी वर्षातून कमीतकमी तिन वेळा आपल्या बीट मधील प्राथमिक शाळांची तपासणी करावी.

11) शाळातपासणी नंतर शिक्षणविस्तार अधिकाऱ्यांनी शिक्षक, मुख्याध्यापक यांची संयुक्त बैठक घ्यावी व त्यांना मार्गदर्शन करावे.

12) शिक्षणविस्तार अधिकाऱ्यांनी शाळातपासणीच्या वेळी दिलेल्या सूचनांची शिक्षक मुख्याध्यापकाकडून योग्य कार्यवाही व्हावी.सूचनांची कार्यवाही झाली किंवा नाही याची पडताळणी शिक्षणविस्तार अधिकाऱ्यांनी पुढील शाळाभेटीच्यावेळी करावी.

13) शिक्षणविस्तार अधिकाऱ्यांनी शालेय अभिलेख काळजीपूर्वक पहावेत. त्यात कांही त्रुटी किंवा अनियमितता असल्यास मुख्याध्यापकांच्या निदर्शनास आणाव्यात. विशेषत: शाळेमार्फत होणारा अर्थिक व्यवहार व्यवस्थित होत आहे किंवा नाही याची

वेळोवेळी पडताळणी व्हावी.

6.20 **गटशिक्षणाधिकारी यांच्या मुलाखतीतील माहिती विषयक शिफारशी**

1) प्राथमिक शाळेतील शिक्षकांना वेळेवर वेतनवाढी दिल्या जाव्यात.

2) गटशिक्षणाधिकाऱ्यांनी प्राथमिक शिक्षणाच्या शैक्षणिक बाबीकडे पुरेसे लक्ष द्यावे.

3) आदर्श शिक्षकाच्या निवडीच्या वेळी गटशिक्षणाधिकाऱ्यांनी वस्तूनिष्ठपणे शिक्षकांची शिफारस करावी.

4) अनधिकृतपणे अनुपस्थित राहणाऱ्या शिक्षकावर कडक कार्यवाही करावी.

6.21 **प्राथमिक शाळांना दिलेल्या भेटी निरीक्षणा बाबत शिफारशी**

1) प्राथमिक शाळांच्या इमारती चांगल्या असाव्यात व सर्वच शाळांना स्लॅब असावा.

2) प्राथमिक शाळांच्या इमारती गावापासून थोड्यादूर अंतरावर असाव्यात.

3) वर्ग खोल्या स्वच्छ असाव्यात. वायूविजन व प्रकाश व्यवस्था चांगली असावी.

## विभाग "क"

## पुढील संशोधनासाठी विषय

शैक्षणिक प्रशासन याविषयाची व्याप्ती अतिशय मोठी आहे ही व्याप्ती कमी करुन अभ्यासकाने प्रस्तुत संशोधन केले आहे. प्रस्तुत संशोधनात अभ्यासकाने केवळ प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनाचा अभ्यास केला आहे. शिक्षणाच्या वेगवेगळ्या स्तरावर प्रशासन काम करते. शिक्षणाच्या विविध स्तरावरील प्रशासनाचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

प्रस्तुत संशोधन करीत असताना अभ्यासकास प्रशासनातील विविध स्तरांचा अभ्यास करणे शक्य झालेले नाही. शैक्षणिक क्षेत्रातील प्रशासन प्रभावी होण्यासाठी विविध स्तरांचा जरुर विचार व्हावा असे संशोधकास वाटते. प्रस्तुत संशोधन करीत असताना संशोधकास प्रशासनातील असे कांही विषय अढळलेकी, त्यावर प्रकाश टाकता येईल. ते विषय पुढे दिलेले आहेत.

**6·22) माध्यमिक शाळेच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास**

शिक्षण प्रक्रियेतील प्रशासनाचा आरंभ प्राथमिक स्तरापासून होतो. प्राथमिक स्तरानंतर माध्यमिक स्तराला शैक्षणिक दृष्ट्या महत्व देण्यात आलेले आहे. शिक्षण प्रणालित रोज नविन प्रयोग घडून येत आहेत. शिक्षण प्रणालित झालेल्या बदला नुसार माध्यमिक शाळेच्या प्रशासनात बदल होणे आवश्यक आहे.

सध्या माध्यमिक शाळा वेगवेगळ्या व्यवस्थापना द्वारे चालविल्या जातात. जिल्हा परिषद, नगर पालिका व खाजगी संस्था माध्यमिक शिक्षणाचे काम पार पाडतात. जिल्हा परिषद, नगर पालिका, व खाजगी संस्था याच्या प्रशासनात समानता आढळत नाही. माध्यमिक शिक्षणासाठी दिल्या जाणाऱ्या अनुदान पध्दतीमध्ये सुसूत्रता नाही. माध्यमिक शिक्षणासाठी अधिक आर्थिक तरतूद करणे आवश्यक आहे. माध्यमिक शाळेच्या प्रशासनात येणाऱ्या समस्यांचा सखोल अभ्यास करुन त्यावर उपाय योजना सूचविणे आवश्यक आहे.

**6·23 कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास**

सध्या 10 + 2 या स्तरावरील, + 2 हा स्तर माध्यमिक शाळा किंवा वरिष्ठ महाविद्यालयाना जोडलेला आहे. +2 स्तर ज्याला 11वी व 12वी वर्ग जोडलेले आहेत त्यांना उच्चमाध्यमिक किंवा कनिष्ठ महाविद्यालय असे संबोधले जाते.

कांही ठिकाणी माध्यमिक शाळांना व कांही ठिकाणी वरिष्ठ महाविद्यालयांना 11वी व 12वी चे वर्ग जोडल्यामुळे यास्तरावर आर्थिक, शैक्षणिक व प्रशासकीय समस्या निर्माण झालेल्या आहेत.

उच्चमाध्यमिक हा स्तर जोडून असल्याने माध्यमिक व महाविद्यालयीन स्तरावर अध्ययन व अध्यापन पध्दतीत फरक आढळतो. आज उच्चमाध्यमिक शाळांच्या प्रशासनाचे काम त्याशाळांचे मुख्याध्यापक पहातात व वरिष्ठ महाविद्यालयातील +2 स्तरावरील प्रशासनाचे काम प्राचार्य पाहतात. त्यामुळे या स्तरावर प्रशासकीय व शैक्षणिक अडचणी निर्माण झालेल्या आहेत.

कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रशासन त्यावर्गांना शिकविणाऱ्या शिक्षकांकडे नसल्यामुळे, यास्तरावर अनुदान, सेवाभर्ती, तासिका कालावधी, शिक्षकांची वेतनश्रेणी, सेवाशाश्वती या अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत.

त्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रशासनाचा सखोल अभ्यास करुन उपाय योजना सूचविणे आवश्यक आहे.

## 6·24 वरिष्ठ महाविद्यालयांच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास करणे

वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षणाचा स्तर व्यक्तीविकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षण हे समाज जीवन, गरजा व आकांक्षा यांच्याशी निगडीत झाले पाहिजे. राष्ट्रीय व सामाजिक एकात्मता वाढिस लागली पाहिजे नविन आव्हानांना सामोरे जाण्यासाठी नविन ज्ञान व भावी गरजा यांचा विचार करुन वरिष्ट महाविद्यालयांच्या प्रशासनात येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करुन त्यासमस्या सोडविण्यासाठी त्यावर उपाय शोधणे गरजेचे आहे.

## 6·25 पूर्वप्राथमिक शाळांसाठी स्वतंत्र प्रशासन निर्मिती संबंधी पाहणी करणे

प्राथमिक शाळेमध्ये प्रवेश घेण्यापूर्वी जे शिक्षण दिले जाते त्यास पूर्वप्राथमिक शिक्षण म्हटले जाते. हे शिक्षण जिल्हा परिषदेच्या अंतर्गत एकात्मिक बालविकास कार्यक्रम या योजने द्वारे व खाजगी संस्थामार्फत चालविल्या जाणाऱ्या बालवाड्या व अंगणवाड्या मार्फत दिले जाते.

आज या बालवाड्या, अंगणवाड्या यांचे प्रशासन पाहण्यासाठी कोणतेही सक्षम प्रशासन उपलब्ध नाही. त्यामुळे पूर्वप्राथमिक शिक्षणाकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. या स्तरावर त्यावर्गांना शिकविणाऱ्या शिक्षकांच्या अनेक समस्या आहेत. तसेच या स्तरावर अनुदान, सेवाभर्ती, तासिका कालावधी, शिक्षकांची वेतनश्रेणी, सेवाशाश्वती या अनेक समस्या निर्माण

झालेल्या आहेत.

पूर्वप्राथमिक शिक्षण प्रभावी होण्यासाठी या स्तरांसाठी स्वतंत्र प्रशासनाची सोय असणे आवश्यक आहे. त्यासाठी पुर्व प्राथमिक शाळासाठी स्वतंत्र प्रशासन निर्मिती करता येईल कका? यासंबधी पाहणी करणे आवश्यक आहे. त्याच बरोबर पूर्वप्राथमिक शिक्षणात येणाऱ्या समस्या दूर करण्यासाठी उपाय शोधणे गरजेचे आहे.